Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# आजचा युवक आणि गांधी विचार दिग्दर्शन

**प्रा. डॉ. सुषमा देशपांडे**
इतिहास विभाग प्रमुख,
इतिहास संशोधक पीएचडी मार्गदर्शिका
डॉ.सौ.इं. भा.पा. महिला महाविद्यालय
मोबाईल नंबर - ९०४९३६९२८२
sushma.deshpande1017@gmail.com

१९ वे शतक हे यांत्रिक प्रगतीचे होऊन गेले तर २० वे शतक हे तंत्रज्ञान व जागतिकीकरणाचे आणि २१ वे शतक हे वरील दोन्ही शतकातील प्रगतीचा म्हणजेच विज्ञान व अध्यात्मिकता यांचा सुरेख संगम साधून मानवी जीवन अधिकाधिक शांत, समृद्ध कसे होईल यावर संशोधन व विचार करण्याचे आहे. आज विज्ञानाने वारेमाप प्रगती केली आहे, सर्व सुखसोयी, भौतिक साधने, भौतिक सुखे मानवासमोर हात जोडून उभी आहेत पण आज मानवाने मन: शांती गमावली आहे. त्याचा परिणाम म्हणून चिंता, तणाव, ह्या गोष्टी मानवी जीवनात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.

या सर्व समस्यांवर उपाय म्हणून गांधी तत्वज्ञान सांगते की, विज्ञानाला अध्यात्माची जोड देऊन मानवी जीवन सुखी ,समाधानी करावे. गांधी विचारात विज्ञान आणि मानवता तसेच भौतिकीकरण आणि अध्यात्मिकता यांचा समतोल साधून जीवन विकास कसा करावा. तसेच शरीर,मन, आत्मा यांचा विकास एकाच वेळी कसा साधावा याचा संदेश गांधी विचारात आहे. आजची वैज्ञानिक साधने जसे दूरध्वनी, इंटरनेट, मोबाईल, दूरचित्रवाणी ही साधने प्रामुख्याने युवकांकडून अधिक वापरली जातात आणि याच माध्यमांद्वारे युवकांना महात्मा गांधीजींच्या विचारांचे आकलन व्हावे किंवा त्यांचे विचार युवकांपर्यंत पोहोचावेत.

महात्मा गांधीजीनी युवकांकडे नेहमीच भविष्यकालीन भारताचे आधारस्तंभ म्हणून बघितले. या युवकांव्दारेच राष्ट्रापुढे उभ्या असलेल्या अनेक समस्या सोडविल्या जाणार आहेत व हे सामर्थ्य फक्त नवयुवकांमध्येच आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता. आज ज्या वेगाने माहिती तंत्रज्ञानाचे जाळे निर्माण होत आहे व त्यामुळे देशाच्या सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक जीवनात तीव्र गतीने बदल घडत आहे अशा परिस्थितीत उद्या नैतिक मूल्यांचे स्मरणही युवकांना रहावे व त्यांनी कमीतकमी भौतिक गोष्टींच्या आहारी जावे. भौतिक प्रगतीच्या अधिक लोभामुळे मानवता नष्ट होणार नाही याचीही काळजी घ्यावी पौर्वात्य व पाशिमात्य म्हणजे अध्यात्मिकता व भौतिकता यांचा मेळ घालून युवकांनी प्रगतीच्या वाटा निवडाव्यात. केवळ युवकांनीच नव्हे तर प्रत्येकानेच स्वत: बरोबरच दुसऱ्यांच्या आनंदाचा विचार करावा असे गांधी तत्वज्ञान सांगते. Have more ऐवजी just enough ची भावना मुलांमध्ये दृढ व्हावी व

प्रत्येकानेच दुसऱ्यांसाठी त्याग करण्यात मनाचा मोठेपणा दाखववावा असा उपदेश गांधीजी तरुणांना करतात.

युवकांमध्ये जबाबदारीची जाणीव, कठोर परिश्रम आणि स्वावलंबी वृत्ती असावी संपत्तीचा विनियोग जपून करावा तसेच युवकांनी न्यायवृत्ती, समान संधी या गोष्टींवर विश्वास ठेवावा. गांधीजींनी तरुणांना उपदेश केला आहे की, भारतात जर प्रत्येक तरुणाने प्रयत्न केला तर प्रत्येकाला संधी मिळू शकते अनेक कठीण प्रसंगांना तोंड देतांना काही ठिकाणी यश तर काही ठिकाणी अपयशला सामोरे जावे लागते. प्रतिकूल परिस्थितीतही कष्ट, संघर्ष करण्याचा आत्मविश्वासच आपल्याला यश मिळवून देतो अशी गांधीजींची नितांत श्रद्धा होती. म्हणूनच ते भारतीय तरुणांना कष्ट,प्रामाणिकपणा, संघर्ष करण्याची तयारी प्रत्येक तरुणाने ठेवावी असा उपदेश करतात.

सशक्त भारतासाठी मानसिक व शारीरिक दृष्टीने सशक्त तरुणांची गरज लक्षात घेता मुल्याधिष्टीत शिक्षण हवे असे गांधीजी म्हणतात. कारण उच्च शिक्षित, कुशल, सुशिक्षित तरुणांचे गटच चांगले रोजगार, चांगले उद्योग निर्माण करू शकतील त्यासाठी प्रत्येकाला मुल्याधिष्टीत व तांत्रिक शिक्षणाची गरज गांधीजीनी सांगितली. आपले सर्व ज्ञान, पांडित्य एकीकडे व सत्य व पवित्रता एकीकडे असे ठेवल्यास सत्य आणि पावित्र्याचे पारडे अधिक जड होईल म्हणून त्यांनी तरुणांना उपदेश केला की प्रत्येकाने आपले मन आणि शरीर पवित्र ठेवावे. गांधीजी शिक्षकांनाही सत्य आणि पावित्र्याचे आचरण करण्याचा उपदेश करतात.

भारतीय युवकांनी ग्रामीण भारतात जाऊन, विनम्र भावनेने एका शांतीदुतासारखे कार्य करावे. ग्रामीण भागात जाऊन युवकांनी स्वच्छतेचा संदेश द्यावा. तुमचे वागणे, बोलणे एव्हडे आदर्श असावे की आपोआपच तुमच्याकडे पाहून खेड्याच्या लोकांना तुमचे अनुकरण करावेसे वाटावे. कारण ग्रामीण सभ्यतेला संपवून शहरी सभ्यता निर्माण करणे गरजेचे आहे. ग्रामीण सभ्यता निर्माण करायची असल्यास त्यातील दोष दूर करण्याचे उपाय गांधीजींनी सांगितले आहेत. याबाबतीत ते युवकांना उपदेश करतात की, भारतीय युवकांनी ग्रामीण संस्कृतीला स्विकारले पाहिजे, युवकांनी आपले जीवनमान बदलले पाहिजे आपल्या सुट्टीचे दिवस शहरालगतच्या ग्रामीण भागात व्यतीत केले पाहिजे. स्वत: शिक्षण,आरोग्य,स्वच्छता हे विषय शासकीय यंत्रणेच्या मदतीची अपेक्षा न करता स्वत: ग्रामीण भागातील लोकांना शिकविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. असा उपदेश ते तरुणांना करतात.

महात्मा गांधीना सशक्त भारत निर्माण करायचा होता आणि त्या दृष्टीकोनातून ते युवा पिढीकडे पाहत होते. आज राष्ट्रासमोर समस्या आहेत ते सोडविण्याचे सामर्थ्य युवकांमध्ये आहे याची त्यांना पूर्ण खात्री होती.

भारत देश हा युवकांचा देश आहे. ५५% पेक्षा अधिक युवक देशात राहतात. गांधीजीनी युवकाचा अर्थ असा सांगितला आहे की युवक म्हणजे जो, ज्याच्यात उत्साह, तेज, चिकाटी आहे. युवकांमध्ये प्रचंड ताकद, धाडस असते म्हणून या गोष्टींचा योग्य वापर केला जावा म्हणजे देशाच्या एकतेसाठी,विकासासाठी ते महत्वाचे ठरेल. युवकांच्या मनात आपण ज्या देशात राहतो त्या देशाबद्दल निष्ठा निर्माण होणे गरजेचे आहे. अशा युवकांमधून देशाचा विकास शक्य आहे. 'Not me but you' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद ही महात्मा गांधीजींची संकल्पना आहे. युवकांची ताकद राष्ट्राच्या विकासासाठी उपयोगात आणता येते पण त्या युवकांसमोर गांधी विचारांचा आदर्श ठेवावा लागेल. आजच्या युवकांनी महात्मा गांधीजींचे तत्व व विचार आत्मसात केल्यास युवकांमध्ये सकारात्मक व योग्य परिवर्तन घडून येईल.

गांधीजींच्या मते शाळा, महाविद्यालयातील शिक्षण पूर्ण केल्यानंतर युवकांची बौद्धिक तसेच शारीरिक क्षमता राष्ट्र विकासाकरिता उपयोगात आणता येते. देशात आज खूप मोठ्या प्रमाणावर हिंसा दिसते पण आजच्या तरुणांनी जर अहिंसेचे तत्व स्विकारले तर देशाला निश्चितच शांततामय जीवन जगता येईल. सर्वोदय, ग्रामस्वराज्य, सामाजिक न्याय, अस्पृश्योद्धार या गोष्टी गांधी तत्वज्ञानातीलच आहेत.

आजची तरुणपिढी भ्रष्ट राजकारण, जातीयवाद, व्यसनाधीनता यात पूर्णतः अडकून गेली आहे, आजचा तरुण अनेकदा अनैतिक मार्गाने पैसा मिळविणे, चोरी, यात गुंतला आहे तरुणांना त्यांच्या भविष्याची मुळीच काळजी नाही यामुळे अनेकदा मुले दहशतवादी कारवायांमध्ये गुंतली जातात.

युवकांच्या समस्यांवर गांधीजींचे आदर्श विचार, तत्त्वज्ञान निश्चितच रामबाण उपाय ठरू शकतात. गांधींजींच्या मते आजच्या तरुणांसाठी उदारमतवादी मानवीय शिक्षणाचा अंगीकार करावा व तरुणांमध्ये शांतीपूर्ण सहअस्तित्व व बंधुता वाढीस लागावी यासाठी प्रयत्न करावा, तरुणांना काम द्यावे जेणेकरूणन त्यांच्यातील नैराश्य दूर होईल त्यांची बेकारी दूर झाल्यास त्यांचे विचार, त्यांचे कार्य सकारात्मकतेकडे निश्चितच जाईल. शांतता, सहकार्य, सहअस्तित्व ही गांधीजींची त्रिसूत्री तरुणांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरेल. गांधीजी म्हणतात की, तरुणांनी आपले प्रयत्न सोडू नये, ग्रामीण भाग स्वच्छ व सुंदर करावा, ग्रामातील निरक्षरता दूर करण्यासाठी तेथील लोकांना ग्राम आंदोलनात सहभागी करून घेतल्यास ग्रामीण भागातील जीवनमान नक्कीच उंचावेल. ग्रामीण भागातील स्वच्छतेला गांधीजींनी नेहमीच प्राधान्य दिले त्यांच्या मते युवकांना ग्रामसफाई शिकवून त्यांना ग्राम सेवा करण्यासाठी पात्र बनविले पाहिजे.

राष्ट्रभाषेशिवाय राष्ट्र एकसंघ बनणार नाही म्हणून ग्रामसेवकांनी (तरुणांनी) हिंदू- मुस्लिम अशी सर्वांना समजेल अशी भाषा अवगत करावी. युवकांनी शारीरिक श्रमाची लाज न बाळगता शारीरिक श्रम करावेत. तसेच ते तरुणांना सांगतात की, ज्ञान एका बाजूला व सत्य व पवित्रता एका बाजूला ठेवल्यास सत्य व पवित्रतेचे पारडे जड होईल. नैतिक अपवित्र्याची हवा आज युवकांमध्ये पसरली आहे. तेंव्हा युवकांनी मन, शरीर पवित्र ठेवा. जर तरुणवर्ग त्यांचे शिक्षण दैनंदिन जीवनात उपयोगात आणू शकला

नसेल तर त्यांचे ते ज्ञान व्यर्थ आहे. जे युवक वाईट मार्गाला लागले त्यांनी ध्यान द्यावे की, आपल्यामुळे देशाचे खूप नुकसान होत आहे. युवकांनी आत्मोन्नतीकडे लक्ष देऊन ईश्वराचे ध्यान व चिंतन याद्वारे स्वत: ला सक्षम बनविले पाहिजे. प्रत्येक युवकांनी ग्रामसेवा करतांना चरखा केंद्र स्थानी ठेवावा तसेच युवकांनी गावोगावी फिरून लोकांमधील आळस दूर करावा व चरखा घरोघरी पोहचवावा.

शेवटी युवकांनी देशातील ज्या -ज्या गोष्टी शांततेत बाधा आणतात त्यांना विरोध करावा कारण युवकांना अशक्य काहीच नाही. युवकांनी अखिल समाजासाठी रचनात्मक कार्य करावे तसेच युवक व खेड्याचे नाते घट्ट व्हावे म्हणून गांधीजींचे विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी विद्यापीठातील युवा वर्गात गांधीजींचे विचार व संस्कार पोहचविले जात आहेत. यामुळे गांधी विचारांचा निश्चितच आदर्श त्यांच्या समोर राहिल.

## संदर्भ ग्रंथ सूची

१) सर्वोदय - गांधीजी, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, फेब्रुवारी -२००७
२) गांधीजीके सिद्धांत - गुणवंत शहा, सत्ता साहित्य मंडल प्रकाशन,नई दिल्ली -२००८
३) गांधी विचार आणि युवकांची सक्रियता – डॉ. सौ. सूर्यकांता अजमेरा, अथर्व पब्लिकेशन धुळे - २०११
४) "भविष्यकालीन शांततेसाठी गांधी विचारांचा पुनर्शोध":- डॉ.पाटील आर. आर. , अथर्व पब्लिकेशन ,धुळे- २०१३
५) महात्मा गांधी यांचे संकलित वाड्मय खंड १५, महात्मा संकलित वाड्मय भाषांतर समिती समिती, महाराष्ट्र राज्य मुंबई, १९७०
६) "गांधी मोहनदास करमचंद":- देशपांडे पांडुरंग गणेश, हिंद स्वराज्य ,नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १९४६
७) "गांधीजी आणि समता – संपा. जाधव श्रीराम , महात्मा गांधी अध्ययन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.
८) "गांधींचा वारसा – देवगीरीकर त्र्यं. र. – महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, कोथरूड पुणे, १९७२
९) "गांधी के विचारोंकी २१ वी सदि मे प्रासंगिकता":- जैन माणक, आदी पब्लिकेशन जयपूर-२०१०
१०)"महात्मा गांधीजींची युवकांसाठी विचारधारा":- डॉ.पाटील डी.डी.,अथर्व पब्लिकेशन,धुळे -२०११